घरांतआलाबाईलेपें ॥ ह्मणेआतांउगवींमोडीं ॥ डोई बोडोआपुली ॥ ६ ॥ तीर्थस्वर्गींनेणेगंगा ॥ पूजनलिंगा गावीचिया॥ अडकूनिद्वारबैसेंद्वारीं ॥ आल्याघरींह्मणे वोस ॥ ७॥ तुकाह्मणेऐसेआहेतगाहरि ॥ याहीतारिजी वासी ॥ माझ्याभयवाटेचित्तीं ॥ नकाजातीह्मणउनी ॥ ॥ ८ ॥ ॥ २७२४॥

जाणेवर्तमान ॥ परितेंनवारेत्याच्यानें ॥ १ ॥ तोहिकार णाचादास ॥ देवह्मणवितांपावेनाश ॥ २ ॥ वेंचींअनु ष्ठान ॥ सिद्धीकरावयाप्रसन्न ॥ ३ ॥ तुकाह्मणेत्याचें॥ मुद्दलगेलेंहाटवेंचे ॥ ४ ॥ २७२५॥

घातलेंदुकान॥पढियंतैसाआहेवान ॥ १॥ आह्मीभांडा रीदेवाचे ॥ घ्यावेंघ्यावेंमापवाचे ॥ २॥ उगऊंजाणोमो डी ॥ झालीनव्हेत्याचीजोडी ॥ ३ ॥ तुकाह्मणेपुडी ॥ मो लातैसीखरीकुडी ॥ ४॥ ॥ २७२६॥

सादाविलेंयेकां ॥ सरेअवघियालोकां ॥ १॥ आतांआ वडीचेहातीं ॥ भेदनाहींयेपंगती॥ २॥ मोकळींचपोतीं॥ नाहींपुसायाचीगुंती ॥ ३ ॥ तुकाह्मणेबरा ॥ आहेढसा ळवेव्हारा ॥ ४ ॥ ॥ २७२७॥

तडामोडीकरा ॥ परीउत्तमतेंभरा ॥ १ ॥ जेणेंखंडेयेके खेपे ॥ जायतेथेंलाभेवोपे ॥ २ ॥ दाविल्यासारिखें॥मा गेंनसावेंपारिखें ॥ ३ ॥ मागेंपुढेंरीण ॥ तुकाह्मणेफिटेही न ॥ ४ ॥ ॥ २७२८॥

नसावेंवोशाळ ॥ मगमानितःसकळ ॥ १ ॥ जायेतेथेंपा

वेमान॥ चालेबोलिलेंवचन ॥ २ ॥ राहोंनेदीबाकी॥ दानज्याचेंत्यासींटाकी ॥ ३ ॥ व्हावावाटेजना ॥ तुका ह्मणेसाठीगुणा॥ ४॥ ॥२७२९॥

श्रीअनघड सिद्धाच्याशब्देंकरून रामेश्वरभट्टास दाह झाला तो या अभंगें शमला.

चित्तशुद्धतरींशत्रुमित्रहोती ॥ व्याघ्रहेनखातीसर्पत या॥ १॥ विषतेंअमृतआघाततेहीत॥अकर्तव्यनीतहो यत्यासी॥ २ ॥ दुःखतेंदेईलसर्वसूखफळ॥ होतीलशी तळअग्निज्वाळा॥ ३ ॥ आवडेलजीवाजीवाचियेपरी सकळांअंतरींयेकभाव ॥ ४ ॥ तुकाह्मणेकृपाकेलीना रायणें॥ जाणिजेतेयेणेंअनुभवें॥ ५॥ ॥ २७३०॥

लाजवाटेमजमानितीहेलोक ॥ हेतोनाहींयेकमाझेअं गीं॥ १ ॥ मोजूनिझिजलोंमापांचियेपरी॥ जाळावी तेथोरीलाभावीण॥२॥ कोमळकंटकतीक्षणअगारी॥ पोचटतेवरीअंगकांती ॥ ३ ॥ चित्रींचेंतेंलपेश्रृंगारिलें निकें॥ जीवेविणफिकेंरूपत्याचें ॥ ४ ॥ तुकाह्मणेदिसे वायांगेलोंदेवा॥ अनुभवठावानाहींतेणें॥५॥२७३१

बोलविसीमाझेमुखें॥ परीजायाजनावाटेदुःख॥ १॥ज याजयाचीआवडी॥ तयालागींतेचरफडी॥ २ ॥ कठी णदेतांकाढा॥ जल्पेरोगीमेळवीदाढा॥ ३ ॥ खाऊंनये तेंचिमागे॥ निवारितांरडोंलागे॥ ४ ॥ पैंवैद्याभीडका य॥ आतताईजीवेंजाय॥ ५॥ नयेभीडासांगोंआन॥ पथ्यऔषधाकारण॥ ६ ॥ धनमायापुत्रदारा ॥ हेतो

आवडीनरकाथारा ॥ ७ ॥ तुकाह्मणेयात ॥ आवडते
करामात ॥ ८ ॥ ॥ २७३२ ॥
पतिव्रतेआनंदमनीं ॥ शिंदळखोंचेव्यभिचारवचनीं ॥
॥ १ ॥ जळोवर्मलागोआगो ॥ शुद्धपणभलेंजगीं ॥ २ ॥
सुखपुराणीआचारशीळा ॥ दुःखवाटेअनर्गळा ॥ ३ ॥
शूराउल्हासआंगीं ॥ गांढ्यामरणतेप्रसंगीं ॥ ४ ॥ शुद्ध
सोनेउजळलेंआगीं ॥ हीनकाळेंधांवेरंगीं ॥ ५ ॥ तुकाह्म
णेतोचिहिरा ॥ घणघायेंनिवडेपुरा ॥ ६ ॥ ॥ २७३३ ॥
चालतीआडवाट ॥ आणिकांदावीतीजेनीट ॥ १ ॥ न
मानीतयाचेउपकार ॥ नाहींजोडातोगव्हार ॥ २ ॥ वि
षसेउनीवारिमागें ॥ प्राणजाताजेणेसंगे ॥ ३ ॥ बुडतां
हाकमारी ॥ ठावनाहींआणिकावारी ॥ ४ ॥ तुकाह्मणे
नकरींहिंका ॥ गुणघेउनीअवगुणटाका ॥ ५ ॥ २७३४ ॥
कुळींचेंदैवतज्याचेंपंढरिनाथ ॥ होईनदासीसुतत्याचे
घरीं ॥ १ ॥ शुद्धयातिकुळवर्णाचाडनाहीं ॥ करिभल
तेठाईदासतूझा ॥ २ ॥ पंढरीसीकोणीजातिवारकरी ॥
होईनत्याचेघरींपशुयाति ॥ ३ ॥ विठ्ठलचिंतनदिवस
रात्रिध्यान ॥ होईनपायतणत्याचेपाईं ॥ ४ ॥ तुळसिवृं
दावनजयाचेअंगणीं ॥ होईनकेरसुणीत्याचेघरीं ॥ ५ ॥
तुकाह्मणेहाचीभावमाझेचित्तीं ॥ नाहींआणिकांग
तिचाडमज ॥ ६ ॥ ॥ २७३५ ॥
चंदनाचेअंगींसर्पाचिवसती ॥ भोगीतितेहोतीद्वीपांत
रीं ॥ १ ॥ येकावोझेंयेकालाभघडेदेवा ॥ संचिताचाठे

बावेगळाला ॥ २॥ क्षीराचेवसतीअशुद्धसेवावें॥ ज
ळींतेतेजावेभोगदूरी ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐशीबुद्धीज्या
चिजड ॥त्याह्मूनिदगडबरेंदेवा॥४॥ ॥२७३६॥
अवघियाचाडाकुंठितकरुनिलावीआपुलीचगोडी ॥
आशामनसातृष्णाकल्पनाकरुनियांदेशाधडी ॥ मी
तोपणापासावगुंतलोंमिथ्यासंकल्पतोमाझातोडी ॥
तुझियेचरणींमाझेदोन्हीपक्षअवघीकरूनिदावीपी
डीरेरे ॥ १ ॥ माझेंसाचकायकेलेंमृगजळेंवर्णाया
तिकुळअभिमान ॥ कुमारिभातुकेंखेळतिकौतुकें
कायत्याचेसाचपण ॥ २ ॥ वेगळाल्याभावेंचित्तांत
डातोडिकेलोंदेशघडिमायाजाळें ॥ गोतवित्तमाय
बापबहिणीसुतबंधुवर्गमाझीबाळें ॥ येकायेकनध
रिसमंधुपुरलियापातलीयाजंवळिकाळे ॥ जाणोनि
यात्यागसर्वस्वेंकेलासांभाळींआपुलेंजाळें ॥ ३ ॥ ये
काजवळिधरींआणिकाअंतरीं ॥ तीकायसोयरींनव्ह
तिमाझी ॥ येकासीपालनयेकासीभांडणचाडकवणे
येकाजी ॥ अधिकअसेउणेंकवणकवण्यागुणेंहे
मावनकळेचितुझी ॥ ह्मणोनिचिंतनींराहिलोंश्रीपति
तुकाह्मणेभाकमाझी॥४॥ ॥२७३७॥
आणिकाछळावयाझालासीशाहाणा ॥ स्वहिताघात
लेंखाणें ॥ आडिकपैकेकरुनिसायासेंकृपणेंसांचलें
धन ॥ नजिरेक्षीरश्वानासीभक्षितांयातितयाचागु
ण ॥ तारुण्यदशेअधममातलादवडीहातपायकान ॥

॥ १ ॥ कायझालेंयासवायांकांठकलेहातींसांपडलें टाकितसे ॥ घेऊनिस्फटिकमणिटाकींचिंतामणिना गवलेआपुलेंइच्छे ॥ २ ॥ सिद्धींसेविलेंसेवितीअध मपात्रासारिखेंफळ ॥ सिंपिलातोमोतींजन्मलेंस्वाती स्वेंवरुषलेंसर्वत्रजळ ॥ कापूसपटणयेचिकारणतया सीपातलाकाळ ॥ तेचिभुजंगेंधरिलेंकंठींमाविषझालें त्याचीगरळ ॥ ३ ॥ भक्षूनिमिष्टान्नघृतसाकरसहित सोलोनिकेळें ॥ घालुनिघसींअंगोळीवांतीकरूंपाहेब ळें ॥ कुंथावयाचिआवडीवोवाउन्हवर्णीरडवीबाळें ॥ तुकाह्मणेजेजैसेकरितितेपावतितैसींचफळें ॥ ४ ॥

॥ २७३८ ॥

तुजदिल्हेंआतांकरींयत्नयाचा ॥ जीवेंभावेंवाचाका यामनें ॥ १ ॥ भागलोंदाताराशीणझालाभारी ॥ आ तांमजतारीशरणागता ॥ २ ॥ नेणतांसोसिलीतयाची आटणी ॥ नव्हताहिकोण्हीकांहींमाझी ॥ ३ ॥ वर्मनेणे दिशाहिंडतीमोकट ॥ इंद्रियसुनाटदाहीदिशा ॥ ४ ॥ वे रझारीफेराशिणलोंसायासीं ॥ आतांहृषीकेशीअंगी कारी ॥ ५ ॥ तुकाह्मणेमनइंद्रियाचेसोई ॥ धांवेयासी काईकरूंआतां ॥ ६ ॥ ॥ २७३९ ॥

स्वयंपाककरी॥संशयतोचिधरी॥संदेहसागरीं॥आणि कपरिबुडती॥१॥जाणेविरळायेक॥झालेंतेथीचेंहिसु ख॥देखिलेंबहुतेक॥पुसतांवाटाचुकले॥२॥तोचिजाणे सोंवळें ॥ शोधीविकल्पाचेमुळें ॥ नाचतंपाल्हाळें ॥

जेवींटाळेंकोंडिलें ॥ ३ ॥ तोचिसाधीसंधि ॥ सावधान
त्रिकाळजोबुद्धि ॥ संदेहाचीसंधि ॥ वेठीआणिकधरि
येली ॥ ४ ॥ अखंडतेंध्यान ॥ समबुद्धीसमान ॥ सोंगवा
यांविण ॥ तेंझांकूनिबैसती ॥ ५ ॥ करणेजयासाठीं ॥
जोनातुडेकवणेआंठी ॥ तुकाह्मणेसाठी ॥ चित्तवित्ता
वांचूनी ॥ ६ ॥ ॥ २७४० ॥

माझियासंचिता ॥ दृढदेखोनिबळिवंता ॥ पळसीपंढ
रिनाथा ॥ भेणेंआतांतयाच्या ॥ १ ॥ तरीमजकळला
सी ॥ नव्हतांभेटीजाणिवेशी ॥ येकसंपादिसी ॥ मान
करिसीलोकांत ॥ २ ॥ तरीहेंप्रारब्धजीगाढें ॥ कांहींन
चलेतयापुढें ॥ कायतुजम्यांकोडें ॥ सांकडेंरेघालावे ॥
॥ ३ ॥ भोगाधीपतिक्रियमाण ॥ तेंतुजनागवेआझुन ॥
तरीकांवायांवीण ॥ तुजम्यांशीणकरावा ॥ ४ ॥ तुजन
व्हतामाझेंकांहीं ॥ परिमीनसंडींभक्तीसोई ॥ होकांभ
लत्याठायीं ॥ कुळींजन्मभलतैसें ॥ ५ ॥ तूंभितोसीमा
झियादोषा ॥ कांहींमागणेंतेआशा ॥ तुकाह्मणेऐसा ॥
कांहींनधरीसंकोच ॥ ६ ॥ ॥ २७४१ ॥

लोकमानदेहेंसुख ॥ संपत्तिउपभोगअनेक ॥ विटंबन
दुःख ॥ तुझियेभेटीवांचूनि ॥ १ ॥ तरीमजयेभेटयेभेट ॥
कायठाकलासीनीट ॥ थोरपुण्यवीट ॥ तुजदैवेंचिला
धली ॥ २ ॥ कायब्रह्मज्ञानकरूंकोरडेंचि ॥ रितेंमावेचे
नापाडे ॥ भेटीवणकुडें ॥ तुझियाअवघेंमजवाटे ॥ ३ ॥
आत्मस्थितीचाविचार ॥ कायकरूंहाउद्धार ॥ नदेखतां
धीर ॥ चतुर्भुजमजनाहीं ॥ ४ ॥ रिद्धिसिद्धिकायकरूं ॥

अथवा आगमविचारू ॥ भेटीविणभारू ॥ तुझियेवा
टेमजयाचा ॥ ५ ॥ तुजवांचूनिकांहींव्हावें ॥ ऐसेंनको
माझियेजीवें ॥ तुकाह्मणेद्यावें ॥ दरुशनपायांचें ॥ ६ ॥
॥ २७४२ ॥
तुझाह्मणउनितुजनेणें ॥ ऐसेंकायमाझेंजिणें ॥ १ ॥ त
रीमजकवणाचाआधार ॥ करोनियांराहोंधीर ॥ २ ॥
कायशब्दचिऐकिला ॥ भेटीनसतांगाविठ्ठला ॥ ३ ॥ तु
काह्मणेआतां ॥ अभयदेईपंढरिनाथा ॥ ४ ॥ २७४३ ॥
उद्धवअक्रूरासीं ॥ आणिव्यासअंबऋषी ॥ रुक्मांगद
प्रल्हादासीं ॥ दाविलेंतेंदाखवी ॥ १ ॥ तरीमीपाहेनपा
हेन ॥ तुझेंश्रीमुखचरण ॥ उताविळमन ॥ तयाकारणें
तेथें ॥ २ ॥ जनकश्रुतदेवाकरी ॥ कैसाशोभलासीहरी ॥
विदुराच्याघरीं ॥ कण्याधरींकवतुकें ॥ ३ ॥ पांडवांआ
कांतीं ॥ तेथेंपावसीस्मरती ॥ घातलेंद्रौपदी ॥ यागीबि
रडेंचोळीचें ॥ ४ ॥ करींगोपिकांचेंकवतुक ॥ गाईगोपा
ळांसीसुख ॥ दावीतेंचिमुख ॥ दृष्टीमाझ्याआपुलें ॥ ५ ॥
तरीतूंअनाथाचादाता ॥ मागतियाशरणागता ॥ तुका
ह्मणेआतां ॥ कोडपुरवींमाझें ॥ ६ ॥ ॥ २७४४ ॥
मागताभिकार ॥ झालोंतुझेद्वारीं ॥ देईंमजहरिकृपादान
॥ १ ॥ प्रेमप्रीतीनामउचितकरावें ॥ भावेंसंचरावेंह्रद
यामाजी ॥ २ ॥ सर्वभावेंशरणआलोंपांडुरंगा ॥ कृपा
ळुतूंजगामाजीयेक ॥ ३ ॥ तापत्रयेंमाझीतापवीली
काया ॥ शीतळव्हावयापायतुझे ॥ ४ ॥ संबंधीजनवा

द्दींपीडिलोंपरोपरी ॥ अंतरलोंदूरितुजसीतेणें ॥ ५ ॥ तु
काह्मणेआतांतुझाशरणागत ॥ करावेंसनाथमाय
बापा ॥ ६ ॥ ॥२७४५॥

नमनिनामनमनेत्यासी ॥ वाचाळशब्दपिटीभासी ॥
॥ १ ॥भावनाहींकायमुद्रावाणी ॥ बैसेबगळानिश्चळ
ध्यानीं ॥ २ ॥ नाहींचाडदेवाचीकांहीं ॥ छळणेठाकेत
स्करघाई ॥ ३ ॥ तुकाह्मणेत्याचासंग ॥ नकोशब्दस्प
र्शजग ॥ ४ ॥ ॥ २७४६ ॥

दिनदिनशंकावाढे ॥ आयुष्यनेणवतागाढे ॥ १ ॥ कै
शींभुललींबापुडीं ॥ दंभविषयाचेसांकडीं ॥ २ ॥ विस
रलामरण ॥ त्याचीनाहींआठवण ॥ ३ ॥ देखतदेखत
पाही ॥ तुकाह्मणेआठवनाहीं ॥ ४ ॥ ॥ २७४७ ॥

माझेंमजआतांनदेखेनिसरसीतों ॥ ह्मणउनिआधार
केला ॥ संसाराचीआससांडुनीलौकीक ॥ जीवभाव
तुजदिल्हा ॥ नव्हतीमाझीकोण्हीमीकवणाचा ॥ अर्थ
मोहसांडवला ॥ तारींमारींकरींभलतेंदातारा ॥ होउ
निआतांतुझाठेलोंरे ॥ १ ॥ असोमाझेंकोडेंतुजहेंसाकडें
॥ मीअसेननिवाडेंसुखरूप ॥ बाळकासीचिंताकायपो
टव्यथा ॥ जयाशीरींमायबाप ॥ २ ॥ पापपुण्यश्रुतिआ
टिल्या ॥ शास्त्रासिनलगेचिठाव ॥ विधिनिषेधेंगोवि
लींपुराणें ॥ वेदासीतोअहंभाव ॥ ओंकाराचेंमूळव्या
पिलेंमाया ॥ तेथेंनधराचभाव ॥ ह्मणउनिकाबाडसांडि
येलें ॥ उपसंतांधरिलेंतुझेंचिनाव ॥ ३ ॥ तनमनइंद्रि

येंठवोनिराहिलों ॥ सर्व आशातुझेपाईं ॥ तपतीर्थदान
करऊंकोणाहातीं ॥ आधीनतेंमजकाईं ॥ अहिक्यप
रत्रेंचाडनाहींसर्वथा ॥ जन्मसदामजदेई ॥ मायामोह
पाशकराविषतैसें॥तुकाह्मणेमाझ्याठाईं ॥ ४ ॥ २७४८
तुझेंनामगोडनामगोड ॥पुरेकोडसकळहि ॥ ॥ १ ॥ रस
नायेरारसाविटे ॥ घेतांघोटअधिकहे ॥ २ ॥ आणिका
रसेंमरणगांठी ॥ येणेतुटीसंसारें ॥ ३ ॥ तुकाह्मणेआहा
रझाला ॥हाविठ्ठलआह्मासी ॥ ४ ॥ २७४९ ॥
धालोंसुखेंढेंकरदेऊं ॥ उमटेजेऊंतोवरी ॥ १ ॥ क्रीडा
करूंनिरंजनीं ॥ नपुरेधणी हरिसवें ॥ ॥ २ ॥ अवघेखेळों
अवघ्यामधीं ॥ ढाईनपडोऐसीबुद्धी ॥ ३ ॥ तुकाह्मणे
वांचविता ॥ आह्मासत्तासमर्थ ॥ ४ ॥ ॥ २७५० ॥
येकल्यानेंनव्हेखेळचांग ॥ धरिलासंगह्मणउनी ॥ १ ॥
उमटेतव्हांकळेनाद ॥भेदाभेदनिवडेना ॥ २ ॥ दुसरा
परीयेकऐसा ॥नवजेरीसानिकुरेहि ॥ ३ ॥ तुकाह्मणे
कळत्याकळे ॥ येराखेळेखेळह्मणूं ॥ ४ ॥ ॥ २७५१ ॥
बोलविलेंजेणें ॥ तोचित्याचेंगुह्यजाणे ॥ १ ॥ मीतों
काबाडाचाधनी ॥ जेऊंमागावेंथिकोनी ॥ २ ॥ मजूरा
च्याहातें ॥ मापकेलेंझालेंरितें ॥ ३ ॥ झालापुरविता ॥
पांडुरंगमाझापिता ॥ ४ ॥ मायबापासवें ॥ बाळेंकौ
तुकेंखेळावें ॥ ५ ॥ जैसाकरितीधंदा ॥ तैसापडोनियां
छंदा ॥ ६ ॥ त्याच्यासाचागाईह्मसी ॥ येणेखेळावेंमा

तीसीं ॥ ७ ॥ तुकाह्मणेबोल ॥ माझाबोलतोविठ्ठल ॥ ८ ॥
॥ २७५२ ॥
कांहोतुह्मीमाझीवदविलीवाणी ॥ नेदानिवडुनीपांडु
रंगा ॥ १ ॥ आणिककोणाम्यांपुसावाविचार ॥ समु
ळींसंसारदुराविला ॥ २ ॥ स्वामींसेवाह्मणुनीघेतली
पदरीं ॥ सांगितलेंकरींकारणतें ॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहीं
सिकविलेंजेणें ॥ तोयाच्यावचनेंउगाराहे ॥ ४ ॥ २७५३
सेवकासीआज्ञास्वामीचीप्रमाण ॥ जोंवरीहाप्राण
जायत्याचा ॥ १ ॥ आणिकाचाधाकनधरावामनीं ॥
निरोपावचनींटळोंनये ॥ २ ॥ समयसांभाळुनिआग
ळेंउत्तरें ॥ द्यावेंभेदीवज्रतयापरी ॥ ३ ॥ तुकाह्मणेतरी
ह्मणवावेसेवक ॥ खादलेंतेंहक्कअन्नहोय ॥ ४ ॥ २७५४ ॥
नयेपुसोंआज्ञाकेलीयेकसरें ॥ आह्मासीदुसरेंनाहीं
आतां ॥ १ ॥ ज्याचातोबळिवंतसर्वनिवारिता ॥ आ
ह्माकायचिंताकरणेंलागे ॥ २ ॥ बुद्धीचाजनितोंवि
श्वाचाव्यापक ॥ कायनाहींयेकअंगींतया ॥ ३ ॥ तुका
ह्मणेमजहोईलवारिता ॥ तरीकायसत्तानाहींहातीं ४ ॥
॥ २७५५ ॥
बळवंतआह्मीसमर्थाचेदास ॥ घातलियाकासकळी
काळाशी ॥ १ ॥ तेथेंमाणसाचाकोणआलापाड ॥ उह्लं
घोनिजडगेलोंआधी ॥ २ ॥ संसाराचेबळीसांधिलेंनि
धान ॥ मारिलेदुर्जनषडवर्ग ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेकउर
लाधरींठाव ॥ येरकेलेंवावतृणवत ॥ ४ ॥ ॥ २७५६ ॥

येकगावेंआह्मीविठोबाचेंनाम ॥ आणिकापेंकामना हींआतां॥ १ ॥ मोडुनियांवाटासुक्षमसगर ॥ केलाराज्यभारचालेऐसा॥ २ ॥ लावोनिमृदंगटाळश्रुतिघोष॥ सेऊंब्रह्मरसआवडीनें॥ ३ ॥ तुकाह्मणेमहापातकीपतित॥ ऐशीयाचेंहीतहेळामात्रें॥ ४ ॥ ॥२७५७॥

वाचेचाचापल्यबद्धझालोंकुशळ॥नाहींबीजमूळहाताआलें॥ १ ॥ ह्मणोनिपंढरिरायादुःखीहोतेंमन ॥ अंतरीचेंकोणजाणेमाझें ॥ २ ॥ पूज्यझालोंअंगाआलाअभिमान॥ पुढीलकारणखोळंबलें ॥ ३ ॥ तुकाह्मणेखुणनकळेनिरुती॥सांपडलोंहातींअहंकाराचें॥ ४ ॥ २७५८॥

आतांकाढाकाढीकरबापंढरिराया ॥ नाहींतरिवायांगेलोंदास ॥ १ ॥ जाणतांबैसलोंदगडाचियेनावे ॥ तिचाधर्मघ्यावेप्राणहाचि ॥ २ ॥ मनाचास्वभावइंद्रियांचेवोढी॥ पतनाचेजोडीवरीहाव ॥ ३ ॥ तुकाह्मणेझालीआंधळ्याचीपरी॥ आतांमजहरिवाटदावी ॥ ४ ॥

॥२७५९॥

सज्जनतोशब्दसत्यचिजोमानी ॥ छळिजेदुर्जनीआणिकासी॥ १ ॥ येकगुणकेलाअसेदोहोंठाईं ॥ ज्याचात्यासपाहींजैसातैसा॥ २ ॥ भाविकतोशब्दबोलेहावाणीचा॥ लटिकायावाचावाचाळतो ॥ ३ ॥ परउपकारघडेतोचिभला॥ नाळ्याळतयालादयानाहीं ॥ ४ ॥ जाणिवंततोचिपायरीचजाणे ॥ अधमतोनेणेखुंटजैसा ॥ ५ ॥ हिततेंअनहितकेलेंजैसेंकैसें ॥ तुकाह्मणेपिसें

लागलेंत्या ॥ ६ ॥ ॥२७६०॥

तुझेंनाममुखींनघेतांआवडी ॥ जिव्हातेचिघडीझडो माझी ॥ १ ॥ हेंमजठेईहेंमजदेई ॥ आणिकदुजेंकांहींन मागेंतुज ॥ २ ॥ बधिरकानतुझीकीर्तिनायकतां ॥ पाय नदेखतांजातडोळे ॥ ३ ॥ मनातुझेंध्याननाहींनित्यका ळ ॥ धिगतेचांडाळजळोजळो ॥ ४ ॥ हातपायतेणेपंथें नचालतां ॥ जावोतअनंतागळोनीयां ॥ ५ ॥ तुजवीण जिणेंनाहींमजचाड ॥ तुकाह्मणेगोडनामतुझें ॥ ६ ॥

॥२७६१॥

ह्मणसीहोउनीनिश्चित ॥ हरुनीअवघीचिंता ॥ मगजा ऊंयेकांत ॥ भजनकरूं ॥ १ ॥ संसारसंभ्रमें ॥ आशाला गेपाठी ॥ तेणेंजिवासाठीं ॥ होइलतुझ्या ॥ २ ॥ शेखीना डशीलनाडशील ॥ विषयसंगें ओघानाडशील ॥ मागु तापडशील ॥ भवडोहीं ॥ ३ ॥ शरीरसकळ ॥ मायेचातो बांधा ॥ यासीनाहींकदा ॥ आराणूक ॥ ४ ॥ करिसीत डातोडी ॥ आंतबाह्याकारीं ॥ ऐसेजातीचारी ॥ दिवस वेगीं ॥ ५ ॥ मोलाचीतेघडी ॥ जातीवायावीण ॥ नमि ळेधनमोल ॥ देतांकोडी ॥ ६ ॥ जागाहोईकरीहिता चाउपाय ॥ तुकाह्मणेहायकरिसीमग ॥ ७ ॥ २७६२॥

पांडुरंगेयेईवोपांडुरंगे ॥ जीवाचेजिवलगेयेईवोपांडुरं गे ॥ १ ॥ कनवाळुकृपाळुभक्तालागीमोही ॥ गजेंद्रा चाधांवातूंवाकेलाविठाई ॥ २ ॥ भक्ताचेकैवारेंकष्टली सविठ्ठले ॥ अंबऋषीकारणेंजन्मदाहाघेतले ॥ ३ ॥ प्र

ऱ्हादाकारणेंस्तंभीअवतारझाला ॥ विदारूनिदैत्यप्रेम
पान्हापाजिला॥ ४ ॥ उपमन्यूकारणेंकैसीधांवसीलव
लाहीं॥ पाजीप्रेमपान्हाक्षीरसागराठाईं ॥ ५ ॥ कौरवीं
पांचाळीसभेमाजीआणिली॥ वस्त्रहरणींवस्त्रेंकैसींझा
लींमाउली ॥ ६ ॥ दुर्वासापातलाधर्मछळावयावनीं ॥
धांवसीलवलाहींशाखादेंठघेऊनी ॥ ७ ॥ कृपाळुमाउ
लीभुक्तिमुक्तीचेंभांडार ॥ तुकाह्मणेविठ्ठलेकरींमाझा
अंगीकार ॥ ८ ॥ ॥ २७६३ ॥
कवणाचेंकारणनलगेचिकांहीं ॥सर्वसर्वाठाईंतूंमजये
क ॥ १ ॥ कायावाचामनठेविलेंतुझेपाईं ॥ आतांउरलें
कांहींनदिसेदेवा ॥ २ ॥ कवणापाषाणासीधरूनीयाभा
व॥कवणावरीपावठेऊंआतां॥ ३ ॥ह्मणोनिनिश्चिंतरा
हिलोंतेमनीं ॥तूंचिसर्वाखाणींदेखोनियां॥४॥जळींज
ळकायधोवियेलेंयेक ॥ कवणतेंपातकहरलेंतेथें ॥ ५ ॥
पापपुण्यहेचिवासनासकळ॥ तेतुजसमूळसमर्पिली॥
॥ ६ ॥ पितरस्वरूपींतूंचिजनार्दन ॥ सव्यतेकवणअप
सव्य ॥ ७ ॥ तुकाह्मणेजीतपिंडतुह्माहातीं ॥ देऊनिनि
श्चितीमानियेली ॥ ८ ॥ ॥ २७६४ ॥
शिणलोंदाताराकरितांवेरझारा ॥ सोडवीसंसारापा
सोनियां॥ १ ॥ नसुटेचिबाकीनव्हेझाडापाडा ॥ घात
लेंसेखोडाहाडाचिया ॥ २ ॥ मायबापेंमाझीजिवाची
सांगाती ॥ तेदेतीलहातींकाळाचिया ॥ ३ ॥ पडताळुनि
सुरीबैसलाशेजारीं ॥ यमपाशकरींघेऊनियां ॥ ४ ॥पा

ठींपोटींयेकेलागलीसरसी ॥ नेतीनरकासीवोढूनीयां ॥ ५ ॥ जनसात्यभूतअसेयासकळां ॥ मीयेकनिराळापरदेशी ॥ ६ ॥ कोणाकाकुळतीनाहींकोणेपरी ॥ तुजबिणहरीकृपाळुवा ॥ ७ ॥ तुकाह्मणेमजतुझाचिभरवसा ॥ ह्मणवोनिआशामोकलिली ॥ ८ ॥ २७६५ ॥

देवाचाभक्ततोदेवासीचगोड ॥ आणिकाचीचाडनाहींत्यासी ॥ १ ॥ कवणासोयरानव्हेचिसांगातीं ॥ अवघीयाहातींअंतरला ॥ २ ॥ निष्कामवेडेह्मणतीबापुडे ॥ अवघीयांसांकडेझालाकैसा ॥ ३ ॥ माझेंऐसेंतयानह्मणतीकोणी ॥ असेरानींवनींभलत्याठाई ॥ ४ ॥ प्रातःस्नानकरीविभूतीचर्चून ॥ देखोनीयांजननिंदाकरी ॥ ५ ॥ कंठींतुळसीमाळाबैसोनीनिराळा ॥ ह्मणतियाचांडाळाकायझालें ॥ ६ ॥ गातांशंकानाहींबैसेभलतेठाई ॥ शिव्यादेतीमाईबापभाऊ ॥ ७ ॥ घरींबाईलह्मणेकोठेंव्यालीरांड ॥ बरेंहोतेंषंढमरतातरी ॥ ८ ॥ जन्मोनीयांझालाअवघियांवेगळा ॥ ह्मणोनीगोपाळादुर्लभतो ॥ ९ ॥ तुकाह्मणेजोसंसारारुसला ॥ तेणेचिटाकीलासिद्धपंथ ॥ १० ॥ ॥ २७६६ ॥

कस्तूरीभिनलीजयेह्मृतिके ॥ तयेसिआणिकेकैसीसरी ॥ १ ॥ लोखंडाचेअंगींलागलापरीस ॥ तयाआणिकासींकैसीसरी ॥ २ ॥ तुकाह्मणेमीनवजेयातिवरी ॥ पूज्यमानकरीवैष्णवासी ॥ ३ ॥ ॥ २७६७ ॥

अनुहातध्वनीवाहेसकळपिंडीं ॥ रामनाहींतोंडींकैसा

तरे॥ १ ॥ सकळजीवामाजीदेव आहेखरा॥ देखिल्या दुसराविणनतरे॥२॥ज्ञानसकळांमाजीआहेहेंसाच॥ भक्तीवीणतेंचब्रह्मनये ॥ ३ ॥ कायमुद्राकळल्याकरा व्यासांगतां॥ दीपनलागतांउन्मनींचा ॥ ४ ॥ तुकाह्म णेनकापिंडाचेंपाळण ॥ स्थापूंनारायणआतूडेना ॥ ॥५॥ ॥२७६८॥

नेणेअर्थकांहींनव्हतेमाझेबोल ॥ विनवितोंकोपालसं तझणी ॥ १ ॥ नव्हतिमाझेबोलबोलेपांडुरंग ॥ अ सेअंगसंगव्यापोनीयां ॥ २ ॥ मजमूढाशक्तिकैचाहा विचार॥ निगमादिकपारबोलावया॥ ३ ॥ रामकृष्ण हरीमुकुंदामुरारी॥बोबड्याउत्तरींहेंचिध्यान ॥ ४ ॥ तु काह्मणेगुरुकृपेचाआधार ॥ पांडुरंगेंभारघेतलामा झा॥५॥ ॥२७६९॥

देवासिलागेसकळांपोसावें ॥ आह्माकायखावेंनल गेचिंता ॥ १ ॥ देवासिविचारावेंलागेपापपुण्य॥ आ ह्मासिहेंजनअवघेंभले ॥ २ ॥ देवासिउत्पत्तिलागला संव्हार ॥ आह्मानाहींफारथोडेंकांहीं ॥ ३ ॥ देवासि कामलागलाहाधंदा॥ आह्मासितेसदारिकामिक॥ ४॥ तुकाह्मणेआह्मीभलेदेवाहून ॥ विचारितागुणसर्व भावें॥५॥ ॥२७७०॥

घेईनमीजन्मयाजसाठींदेवा ॥ तुझीचरणसेवासाधा वया॥ १ ॥हरिनामकीर्तनसंतांचेंपूजन॥ घालुनिलो टांगणमहाद्वारीं॥ २॥ आनंदेंनिर्भरअसोभलतेठाईं॥

सुखदुःखानाहींचाडआह्मा ॥ ३ ॥ आणिकसायास नकरींनधरींआस॥होईनउदाससर्वभावें॥ ४ ॥ मोक्ष आह्माघरींकामारीतेदासी ॥ होयसांगोतैसीतुकाह्मणे ॥५॥ ॥२७७१॥

देवातुजमजपण॥पाहोंआगळातोकोण ॥ १ ॥ तरी साचमीपतित॥तूंचिखोटादीनानाथ॥ २ ॥ग्वाहीसा धुसंतजन॥करुनिअंगालावीन ॥ ३ ॥ आह्मीधरिले भेदाभेद ॥ तुजनव्हेत्याचाछंद ॥ ४ ॥ नचलेतुझेंकां हींत्यास॥आह्मीबळकाविलेदोष॥ ५ ॥ दिशाभरल्या माझ्यामनें ॥ लपलासीत्याच्याभेणें ॥ ६ ॥ तुकाह्मणे चित्त॥करितुझीमाझीनीत॥७॥ ॥२७७२॥

लापणीकशब्देंनातुडेहादेव ॥ गुह्यभावमनींचाशुद्ध बोला॥ १॥ अंतरींचाभेदजाणेपरमानंद॥जयासीसं वादकरणेंलागे ॥ २ ॥ तुकाह्मणेजरीआपुलेंस्वहित॥ तरिकरींचित्तशुद्धभाव॥३॥ ॥२७७३॥

नव्हेब्रह्मज्ञानबोलतांहेसिद्ध ॥ जंवहाआत्मबोधनाहीं चित्तीं॥ १ ॥कायकरिसीवायांलटिकाचीपाल्हाळ॥श्र मतोकेवळजाणीवेचा॥ २ ॥मीचदेवऐसेंसांगसिया लोकां ॥ विषयाच्यासुखाठोकोनियां ॥ ३ ॥ अमृता चीगोडीपुढीलासांगसी ॥ आपणउपवासीमरोनीयां ॥ ४॥ तुकाह्मणेजरीराहीलतळमळ॥ब्रह्मतेंकेवळसदो दीत॥५॥ ॥२७७४॥

गंगाजळापाहींपाठीपोटींनाहीं ॥ अवगुणतोकांहींअ

मृतासी ॥ १ ॥ रविदीपकाळिमाकायजाणेहीरा ॥ आ णिकतिमिरानाशतेणें ॥ २ ॥ कर्पूरकांडणींकायकों डाकणी ॥ सिंधुमेळवणीकायचाले ॥ ३ ॥ परिसचिंताम णीआणिकाचागुणी ॥ पालटेलागोनीनव्हेतैसा ॥ ४ ॥ तुकाह्मणेतैसेंजाणासंतजन ॥ सर्वत्रसंपूर्णगगनजैसें ॥ ५ ॥ ॥ २७७५ ॥

परिसकायधातुसोनेंनकरीतु ॥ फेडितोनिभ्रांतुलोहपं गु ॥ १ ॥ कायतयाहूनिझालासीबापुडें ॥ फेडितासाक डेंमाझेंयेक ॥ २ ॥ कल्पतरुकोडपुरवितोरोकडा ॥ चिं तामणिखडाचिंतिलेंतें ॥ ३ ॥ चंदनाचेवासेंवसतांचं दन ॥ होतीकाष्ठआनवृक्षयाती ॥ ४ ॥ कायत्याचेंउणें झालेंत्यासीदेतां ॥ विचारीअनंतातुकाह्मणे ॥ ५ ॥ ॥ २७७६ ॥

तोडोनिपुष्पवटिकावृक्षफळयाती ॥ बाभळाराखती करुनीसार ॥ १ ॥ कोणहिततेणेंदेखिलेंआपुलें ॥ आ णिकपाहिलेंसुखकाई ॥ २ ॥ धान्यबीजेंजेणेंजाळिलीं सकळें ॥ पेरितांकाऱ्हेळेंजीरेंबीज ॥ ३ ॥ मोडुनियांवा टापुढिलाचीसोय ॥ आडरानेजायेघेवुनिलोकां ॥ ४ ॥ विषाचेंअमृतठेऊनियांनाम ॥ करिताअधमब्रह्महत्या ॥ ५ ॥ तुकाह्मणेत्यासनाइकेसांगतां ॥ तयाहालकरि तांपापनाहीं ॥ ६ ॥ ॥ २७७७ ॥

संसाराच्याभेणेपळे ॥ पळोनलाहेसेंकेलें ॥ १ ॥ जेथे तेथेआपणआहे ॥ आह्मीकरावेंतेंकाय ॥ २ ॥ येकांता

सीठाव॥ तिहींलोकींनाहींवाव॥ ३ ॥ गावांजातोंऐसें ॥ नलगेह्मणावेंतेंतैसें ॥ ४ ॥ स्वप्नाचेपरी॥ जागापाहेंतंव घरीं॥ ५॥ तुकाह्मणेकाय ॥ तुझेंघेतलेंम्यांआहे॥ ६ ॥

॥ २७७८॥

आपणकायसादर ॥ बिशीआह्माकांनिष्ठुर॥ १ ॥केले भक्तैतसेंदेई ॥ तुझेंप्रेममाझ्याठाई ॥ २ ॥ कायपंगती सीकोंडा॥ येकांतासीसाकरमांडा ॥ ३ ॥ काययेकप ण॥ पोताघालुनिगांठीखूण ॥ ४ ॥ कायद्यावेंतैसें॥ त याआपणअनारीसें ॥ ५ ॥ तुकाह्मणेसंधी॥ आतांनो हूंभेदबुद्धी॥ ६ ॥ ॥ २७७९ ॥

चित्ततुझ्यापाईं॥ ठेउनिझालोंउतराई॥॥ १ ॥ परितूंखो टाकेशीराजा॥ अंतपारनकळेतुझा ॥ २॥ आह्मीसर्व स्वेंउदार॥ तुजदेवोनीवेव्हार ॥ ३ ॥ इंद्रियांचीहोळी॥ संसारदिल्हाबळी ॥ ४ ॥ नपडेविसर॥ तुझाआह्मानि रंतर॥ ५॥ प्रेमयेकासाठीं॥ तुकाह्मणेनवजेगांठी॥६॥

॥ २७८० ॥

आह्मीपतितह्मणुनीतुजआलोंशरण ॥ करितोंचिं तनदिवसरात्री ॥ १ ॥ नाहींतरीमजकायहोतीचा ड॥ धरावयाभीडतुजचित्तीं ॥ २ ॥ आह्मानताराावेंतु ह्मीकायतरावें॥ सांगाजोजीभावेंनारायणा॥ ३॥ अ न्यायेकाचाअंगीकारकरणें ॥ तयाहातींदेणेंलाजते चीं ॥ ४ ॥ कायतेंशूरत्वमिरउनिबोलणें ॥ जनामध्यें दावणेंबाळराया ॥ ५॥ पोट्याअन्नसत्रघालोनीयांघ

रीं॥ दंडितोबाहेरीआलियासी॥६॥ नव्हेकीर्तिकांहींन मानेचिलोकां॥कायविटंबणातैसीतैसी ॥ ७॥ प्रत्यक्षा सीकायद्यावेंजीप्रमाण॥पाहातांदर्पणसाक्षीकाई॥८॥ तुकाह्मणेतरीआह्माकांनकळे॥ तरलोंअथवाकिंवाना हींआह्मी॥ ९॥ ॥२७८१॥

कागबगरीठामारिलेबाळपणीं॥ अवघींदैत्यखाणीबु डवीली ॥ १॥ तोमजदाखवातोमजदाखवा॥ नंदनं दनजीवाआवडतो॥ २॥ गोवर्धनगीरीउचलिलाक रीं॥ गोकुळभीतरीराखीयेलें॥ ३॥ वधुनिभौमासुरा आणिल्यागोपांगना॥ राज्यउग्रसेनामथुरेचें॥ ४॥ पांडवजोहरिराखिलेकुसरी ॥ विवराभीतरीचालवि ले॥ ५॥ तुकाह्मणेह्यातवभक्तांचाकृपाळ॥ दुष्टजना काळनारायण॥ ६॥ ॥२७८२॥

तुजविणदेवा॥ कोणह्मणेमाझीजिव्हा ॥ १॥ तरीहे हाकांशतखंड॥ पडोझडोनियांरांड॥ २॥ कांहींइच्छे साठीं॥ करीलवळवळकरंटी॥ ३॥ तुकाह्मणेकर॥कटीं तयाचाविसर॥ ४॥ ॥२७८३॥

आतांसर्वहेंचिकाम॥ नविसंबावेंतुझेंनाम॥ १॥ नल गेकरावीहेंचिंता॥ तरणेकरणेकायआतां॥ २॥ आ सनींशयनीं॥दुजेंनाहींध्यानींमनीं॥ ३॥ तुकाह्मणेकृ पानिधी॥ माझीतोडिलीउपाधी॥ ४॥ ॥२७८४॥

नव्हेकांहींकवणाचा॥ भावजाणवलासाचा॥ १॥ ह्म णोनितुझ्यापाईं॥ जीवठेविलानिश्चईं॥ २॥शरीरजा

याचेंकोपट ॥ याचिकायखटपट ॥ ३ ॥ तुकाह्मणेवा
यांवीण ॥ देवाकळोंआलाशीण ॥ ४ ॥ ॥ २७८५ ॥
रज्जुधरोनियांहातीं ॥ भेडसावीलींनेणतीं ॥ कळोंयेतां
चित्तीं ॥ दोरीदोघांसारिखी ॥ १ ॥ तुह्माआह्मामध्येंहरी ॥
झालीहोतीतैशीपरि ॥ म्हगजळाचेपूरी ॥ ठावपाहोंतराव
या ॥ २ ॥ सरिचिंताकभोंवरी ॥ अलंकाराचियापरी ॥
नामेंझालींदुरी ॥ येकसोनेंआटितां ॥ ३ ॥ पिसाचींपार
वीं ॥ करूनिबाजागीरीदावी ॥ तुकाह्मणेतेवी ॥ मज
नकोचाळऊं ॥ ४ ॥ ॥ २७८६ ॥
नेघेतुझेंनाम ॥ नकरींसांगितलेंकाम ॥ १ ॥ वाढेवच
नेंवचन ॥ दोषउच्चारितांगुण ॥ २ ॥ आतांतुझ्याघरा ॥
कोणकरीवेरझारा ॥ ३ ॥ तुकाह्मणेठाईं ॥ मजपासीं
कायनाहीं ॥ ४ ॥ ॥ २७८७ ॥
व्यवहारतोखोटा ॥ आतांनवजोंतुझ्यावाटा ॥ १ ॥ ये
कानामानाहींताळा ॥ केलीसहस्राचीमाळा ॥ २ ॥ पा
होंआतांघाई ॥ खेळसीललपंडाई ॥ ३ ॥ तुकाह्मणेचा
र ॥ बहुकरितोसीफार ॥ ४ ॥ ॥ २७८८ ॥
लटिकाचीकेला ॥ सोंगपसारादाविला ॥ १ ॥ अवघा
बुडालासीरिणें ॥ बहुतांचेंघेणेंदेणें ॥ २ ॥ सुखाचेंउत्त
र ॥ नाहींमुद्दलासीथार ॥ ३ ॥ तुकाह्मणेकाय ॥ तुझें
घ्यावेंउरेहाय ॥ ४ ॥ ॥ २७८९ ॥
ठावनाहींबुड ॥ घरेंवसवितीकुड ॥ १ ॥ भलतेठाईंतु
झावास ॥ सदायेन्हवींउदास ॥ २ ॥ जागानानिजेला ॥

धालानाभुकेला ॥ ३ ॥ नपुसतांभलें ॥ तुकाह्मणेबुझेबो
लें ॥ ४ ॥ ॥ २७९० ॥
लाजनाविचार ॥ बाजारीतूंभांडखोर ॥ १ ॥ ऐसेंज्या
नेव्हावें ॥ त्याचीगांठीतुजसवें ॥ २ ॥ फेडिसीलंगोटी ॥
घेसीसकळासीतुटी ॥ ३ ॥ तुकाह्मणेचोरा ॥ तुलाआ
पणादुसरा ॥ ४ ॥ ॥ २७९१ ॥
श्वानादिल्हीसवें ॥ पायांभोवतेतेंभोंवे ॥ १ ॥ तैसीझा
लीमजपरी ॥ वसेनिकटसेजारीं ॥ २ ॥ जेवितांजवळी ॥
येवोनियांपुसघोळी ॥ ३ ॥ तुकाह्मणेधणी ॥ कोपलेहे
मनानाणी ॥ ४ ॥ ॥ २७९२ ॥
वटवटकेली ॥ नविचारितांमनाआली ॥ १ ॥ मजकरा
लतेक्षमा ॥ कैसेंनेणोपुरुषोत्तमा ॥ २ ॥ उचितनकळे ॥
जिव्हाभलतेंचिबरळे ॥ ३ ॥ तुकाह्मणेकांहीं ॥ लौकिका
चीचाडनाहीं ॥ ४ ॥ ॥ २७९३ ॥
जिवेहोवेसाठीं ॥ पडेसंसारासीतुटी ॥ १ ॥ ऐसींबोलि
लोंवचनें ॥ सवेंघेऊनीनारायणे ॥ २ ॥ येणेनाहींजा
णे ॥ केलेंकोणानमागणें ॥ ३ ॥ नाहींजन्माआलों ॥
करीलऐसेंनेदीबोलों ॥ ४ ॥ ठावपुसीसेणे ॥ तुकाह्मणे
खुटेयेणे ॥ ५ ॥ ॥ २७९४ ॥
आतांपंढरिराया ॥ माझ्यानिरसावेंभया ॥ १ ॥ मनीं
राहिलीआशंका ॥ स्वामीभयार्तासेवका ॥ २ ॥ ठेवा
माथांहात ॥ कांहींबोलोंअभयमात ॥ ३ ॥ तुकाह्मणेला
डें ॥ खेळेंऐसेकरापुढें ॥ ४ ॥ ॥ २७९५ ॥

कवतुकवाणें ॥ बोलों बोबड्या वचनें ॥ १ ॥ हें तों नसावें अंतरीं ॥ आज्ञाधराया चें दूरीं ॥ २ ॥ स्तुति तैसी निंदा ॥ माना समान गोविंदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोलें ॥ मज तुह्मीं शिकविलें ॥ ४ ॥ ॥ २७१६ ॥

असो मागें झालें ॥ पुढें गोड तें चांगलें ॥ १ ॥ आतां माझे मनीं ॥ कांहीं अपराध न मानीं ॥ २ ॥ ने दी अवसान ॥ करितां नामाचें चिंतन ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोलें ॥ तुज अर्धीच गोविलें ॥ ४ ॥ ॥ २७१७ ॥

मातेविण बाळा ॥ आणिक न माने सोहळा ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या चित्ता ॥ तुजविण पंढरिनाथा ॥ २ ॥ वाट पाहे मेघाबिंदु ॥ ने घे चातक सरितासिंधु ॥ ३ ॥ सारसा सवें निशीं ॥ ध्यान रवीच्या प्रकाशीं ॥ ४ ॥ जीवनालागीं मच्छ ॥ जैसे धेनुलागीं वत्स ॥ ५ ॥ पतिव्रते जिणें ॥ भ्रताराच्या वर्तमानें ॥ ६ ॥ कृपणाचें धन ॥ लोभ्यालागीं जैसें मन ॥ ७ ॥ तुका ह्मणे काय ॥ तुजविण प्राण राहे ॥ ८ ॥ ॥ २७१८ ॥

तुज ऐसा कोणी न देखें उदार ॥ अभयदानें शूर पांडुरंगा ॥ १ ॥ शरण येतील्याचे न विचारीसी दोष ॥ न मागतां त्यास अढळ देसी ॥ २ ॥ धांवसी आडणी ऐकोनियां धांवा ॥ कैवारें त्या देवा भक्तांचियां ॥ ३ ॥ दोष त्याचे जाळीं कल्पकोटीवरी ॥ नामासाठीं हरि आपुलिया ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुज वानूं कैशापरी ॥ ये का मुखें हरि आयुष्य थोडें ॥ ५ ॥ ॥ २७१९ ॥

कायतुझेउपकारपांडुरंगा॥सांगोंमीयाजगामाजीअ
तां ॥ १ ॥ जतनहेंमाझेंकरोनिसंचित॥ दिल्हेंअवचित
आणूनियां॥ २ ॥ घडल्यादोषाचेनघालींचभरी ॥ आ
लियासिथोरीकृपादेवा ॥ ३ ॥ नव्हेतेंठाउकेंअयकि
लेंनाहीं ॥ नमागतांपाहींदानदिल्हें ॥ ४ ॥ तुकाह्मणेया
च्याउपकारासाठीं ॥ नाहींमाझेगांठींकांहींयेक ॥ ५ ॥
॥ २८०० ॥

वाळूनियांजनसांडीमजहातीं ॥ करिसीलहरिऐसेंक
धीं ॥ १ ॥ आठवीनपायधरुनिअनुताप ॥ वाहेजळझों
पनाहींडोळां ॥ २ ॥ नावडतीजीवाआणिकप्रकार ॥
आवडतेफारयेकांताची ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसीधरितों
वासना ॥ होईनारायणासाह्यमज ॥ ४ ॥ ॥ २८०१ ॥
सांगतोंतेंमनातेंमाझेंनायके॥ घातावरीठेकेचांडाळहें
॥ १ ॥ ह्मणोनियांपाहेतरतेंबुडतें ॥ नलाहेपुरतेंबळकरूं
॥ २ ॥ कायतेंसंचितनकळेपाहतां ॥ मतिमंदाचिंताउ
पजते ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसेंबळनाहींअंगीं ॥ पाहोनियां
वेगींपारटाकीं ॥ ४ ॥ ॥ २८०२ ॥
आतांनकोचुकोंआपुल्याउचिता ॥ उदारायाकांतार
खुमाईच्या ॥ १ ॥ आचरावेदोषहेंआह्माविहीत ॥ ता
रावेपतिततुमचेंतें ॥ २ ॥ आह्मीतोंआपुलेंकेलेंसेजत
न ॥ घडोतुह्माकडुनघडेलतें ॥ ३ ॥ तुकाह्मणेविठोचतु
रांच्याराया ॥ आहेतेंकासयामोडोंदेशी ॥ ४ ॥ २८०३ ॥
मुखेंबोलावेंतेंजीवींचेंजाणसी ॥ विदितपायांसींसर्व

आहे ॥ १ ॥ आतांहेंचिभलेंभाकावी करुणा ॥ विनि योगतोजाणातुह्मीत्याचा॥ २ ॥ आपुलेंतोंयेथेंकेलेंन व्हेकांहीं॥ साधनाच्यावाहीपडोंनये ॥ ३ ॥ तुकाह्मणे देहदिल्हापिंडदान ॥ वेळोवेळांकोणचिंताकरी ॥ ४ ॥
॥२८०४॥

कामातुरभयलाजनाविचार ॥ शरीरअसारतृणतुल्य ॥ १ ॥ नवलहेलीलाकर्त्याचेंलाघव ॥ प्रारब्धेंतेभावदाखविले॥ २ ॥ लोभालोभयेकाधनाचियेठाईं॥ आणिकाचीसोईचाडनाहीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेभूकनविचारी प्रकार॥ योजेतेंतेंसारयथाकाळें॥ ४॥ ॥२८०५॥

बांधीसोडीहेतोंधन्याचियेहातीं ॥ हेकड्डेगोवितीआपणावळें ॥ १ ॥ भुललियासिनाहींदेहाचाआठव॥ धोतऱ्यानेंभावपालटीला ॥ २ ॥ घरातरीधांवेदाराचियेसोई॥ भिंतीसवेंडोईघेवोनिफोडी ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेवागेला विसरोन ॥ आतांवर्मकोणदावीयासी॥ ४ ॥
॥२८०६॥

कोणहाजन्मताकोणजन्मविता ॥ नकळेरूपावंतामायतुझी ॥ १ ॥ कवणहादाताकवणहामागता॥ नकळेरुपावंतामावतुझी ॥ २ ॥ कवणभोगवीकवणभोगिता॥ नकळेरूपावंतामावतुझी॥ ३ ॥ कवणतेरूपताकवण अरूपता॥ नकळेरूपावंतामावतुझी॥ ४ ॥सर्वांठाईंतूंचिसर्वहिझालासी॥ तुकाह्मणेयासीदुजेंनव्हे॥ ५॥
॥२८०७॥

जेदोषघडलेनफिटेकरितांकांहीं ॥ सरतेतुझ्यापाईंझा
लोंतैसे॥ १ ॥ माझाकांहोकरूंनयेअंगीकार ॥झाले
तिनिष्ठुरपांडुरंगा॥ २॥ यातिहीननयेऐकोंव्यासीवेद॥
तयासिदिल्हेंपदवैकुंठींचें ॥ ३ ॥ तुकाह्मणेकरियेका
चाआभार॥घेसीमाथाभारवाहोनियां॥ ४ ॥२८०८॥
जेथेदेखेतेथेतुझींचपाउलें॥ विश्वचिअवघेंकोंदाटलेंरे
रूपगुणनामअवघामेघशाम॥ वेगळेंतेंकायउरलेंरे॥
जातांलोटांगणींअवघीचमेदिनी ॥ सकळदेवपाठझा
लेंरे॥ सदापर्वकाळसुदिनसुवेळ ॥ चित्तप्रेमेंअसेधा
लेंरे॥ १॥ अवघाआह्मातूंचिझालासी ॥ देवासंसारहे
वाकामधंदारे॥नलगेजाणेकोठेंकांहींचकरणें ॥ मुखीं
नामध्यानसदारे॥ २ ॥ वाचेबोलेतेतुझेचगुणवाद॥मं
त्रजपकथास्तुति॥भोजनसारुठाईफळतांबोलकांहीं॥
पूजानैवेद्यतुजहोती ॥ चालतांप्रदक्षिणानिद्रालोटांग
ण॥ दंडवततुजप्रति ॥ देखोनिदृष्टिपरस्परेंगोष्टी ॥ अ
वघ्यातुझ्यामूर्त्तीरे ॥ ३ ॥ झाल्यातीर्थरूपबावीनदीकू
प॥अवघेंगंगाजळझालें॥महालमंदिरेंमाझ्यातनघेरें॥
झोंपड्याअवघींदेवालयें ॥ ऐकेकानींत्याहरिनामध्व
नि॥ नानाशब्दहोतेझाले॥तुकाह्मणेआह्मीयाविठोबा
चेदास॥ सदाप्रेमेंसुखेंधाले॥ ४॥ ॥२८०९॥
हरिकथेचीआवडीदेवा॥ करितोंसेवादासांची॥ १॥
ह्मणोनिहिंडेमागेंमागें ॥ घरटीजागेघालितसें॥ २ ॥
निर्लज्जभोजनाचेरंगीं ॥ भरतेंअंगींप्रेमाचें ॥ ३ ॥ तु

काह्मणेविकिलेंदेवें ॥ आपणाभावेंसवसाठीं ॥ ४ ॥
॥ २८१० ॥

साधनसंपत्तिहेंचिमाझेंधन ॥ सकळचरणविठोबाचे ॥ १ ॥ शीतळहापंथमाहेराचीवाट ॥ जवळीचनीटसुखरूप ॥ २ ॥ वैष्णवाचासंगरामनामगाणें ॥ मंडितभूषणें अलंकार ॥ ३ ॥ भवनदीआडनव्हतीसीझाली ॥ कोरडीचचालीजावेंपाई ॥ ४ ॥ मायबापदोघेंपाहातील वाट ॥ ठेवोनियांकटींकरउभी ॥ ५ ॥ तुकाह्मणेकेव्हांदेखेंनकळस ॥ पळालीआळसनिद्राभूक ॥ ६ ॥ २८११ ॥

यथार्थवादेंतुजनवर्णवेकदा ॥ बोलतोंतेनिंदाकरितों तुझी ॥ १ ॥ वेदश्रुतितूजनेणतीचकोण्ही ॥ चोविसठेंगणीधांडोळितां ॥ २ ॥ आतांमजक्षमाकरावीतेदेवा ॥ सलगीकेशवाबोलियेलों ॥ ३ ॥ सगुणकींसाकारनिर्गुणकींनिराकार ॥ नकळेहापारवेदश्रुती ॥ ४ ॥ तोआह्मीभावेकेलासीलहान ॥ ठेवोनियांनावेंपाचारितों ॥ ॥ ५ ॥ सहस्रमुखेंशेषशिणलास्तवितां ॥ पारनकळतां ब्रह्माठेला ॥ ६ ॥ तेथेंमाझादेहबुद्धितेचिकाई ॥ थोरमीअन्यायीतुकाह्मणे ॥ ७ ॥ ॥ २८१२ ॥

कृष्णध्यातीचित्तींकृष्णगातीगीतीं ॥ तेहिकृष्णहोतीकृष्णध्यानें ॥ १ ॥ आासनींशयनींभोजनींजेवितां ॥ ह्मणारेहाभोक्तानारायण ॥ २ ॥ वोवियादळणींगावानारायण ॥ कांडितांकांडणकरितांकाम ॥ ३ ॥ नरनारीयातिहोकोणीयेभलती ॥ भावेंऐकाप्रीतिनारायण ॥

॥ ४ ॥ तुकाह्मणेयेकाभावेंभजाहरी ॥ कांतितेदुसरीरू
पयेक॥ ५॥ ॥ २८१३ ॥
डोळियांपाझरकंठमाझादाटी ॥ येवोदेईंभेटीपांडुरं
गे ॥ १॥ बहुदीसटाकिलेंनिरासकांकेलें॥ कोठेवोगुंतलें
चित्ततुझें॥ २॥ बहुधंदातूजनाहींवोआठव ॥ राहिला
सेजीवमाझाकंठीं॥ ३॥ पंढरिसीजातीवारकरीसंतां॥
निरोपबहुतांहातींधाडीं॥ ४॥ तुजविणकोणसावाधां
वाकरीं॥ यावेंझडकरीपांडुरंगे ॥ ५॥ कायतुझीवाटपा
होंकोठवरी ॥ कृपाळुबाहरिविसरलासी ॥ ६॥ येकवे
ळमाझाधरूनिआठवो ॥ तुकाह्मणेयेवोन्यावयासी॥
॥ ७॥ ॥ २८१४॥
कायकरूंयामनाआतां॥ कांविसरतेंपंढरिनाथा॥ १ ॥
करूंसंसाराचीचिंता॥ वेळोवेळांमागुता॥ २॥ अधिक
कोंडतांचरफडी ॥ भलतिकडेघालीउडी ॥ ३ ॥ भज
ननावडेश्रवण॥ धांवेविषयअवलोकून॥ ४॥ बहुतचं
चळचपळ॥ जातांयेतांनलगेवेळ॥ ५ ॥कितीराखोंदो
न्हीकाळ॥ निजलियाजागेवेळ॥ ६॥ मजराखेंआतां॥
तुकाह्मणेपंढरिनाथा॥ ७॥ ॥ २८१५॥
कथातेप्रावर्ण॥ नव्हेभिक्षेचेंतेंअन्न॥ १ ॥ करींयापरी
स्वहित॥ विचारूनिधर्मनीत ॥ २ ॥ देऊळनव्हेघर॥ प्र
पंचपरउपकार ॥ ३ ॥ विधिसेवनकाम ॥ नव्हेशब्दरा
मराम॥ ४॥ हत्याक्षेत्रधर्म॥ नव्हेनिष्कामतेंकर्म॥ ५॥
तुकाह्मणेसंतीं॥ करुनिठेविलीआयतीं॥ ६ ॥ २८१६॥

पडोनियांराहीं ॥ उगाचिसंतांचियेपाई ॥ १ ॥ नलगे पुसणेंसांगावें ॥ चित्तशुद्धिकरीभावें ॥ २ ॥ सहजते स्थिति ॥ उपदेशपरयुक्ति ॥ ३ ॥ तुकाह्मणेभाव ॥ जव ळिधरुनीआणिदेव ॥ ४ ॥ ॥ २८१७ ॥

देवाचेघरींदेवेकेलीचोरी ॥ देवेंदेवनागउनकेलाभि कारी ॥ १ ॥ धावणियांधांवाधावणियांधांवा ॥ माग चिनाहींजावेंकवणियांगावा ॥ २ ॥ सवेंचिहोताचोर घरींचियाघरीं ॥ फावलियावरीकेलेंअवघेंवाटोळें ॥ ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेथेकोणीचनाहीं ॥ नागवलेकोणगेलें कोणाचेंकाई ॥ ४ ॥ ॥ २८१८ ॥

जतनकरारेजतनकरा ॥ घालूंपाहेघरावरीघालाचोर टे ॥ १ ॥ अवघेचनिजोंनकाअवघियेठाईं ॥ वेळअवे ळतरींसांभाळावीकांहीं ॥ २ ॥ सिंतरलीफारखातीभो वतालेफेरे ॥ गेलेनयेहातांसेखीतळमळउरे ॥ ३ ॥ तुका ह्मणेआह्मीकरूंआपुलेंजतन ॥ नलगेकांहींकोणाघा वेंउघडारेकान ॥ ४ ॥ ॥ २८१९ ॥

काळोखीखावोनिकैवाडकेलाधीर ॥ आपुलियाहितें झालोंजनामध्येंशूर ॥ १ ॥ कांरितुह्मीनेणाकांरितुह्मीने णा ॥ अल्पसुखासाठींपडलीविपत्तीच्याघाणा ॥ २ ॥ नाहींऐसीलाजकायतयापेंआगळें ॥ कायनव्हेकेलेंआ पुलियाबळें ॥ ३ ॥ तुकाह्मणेतरीसुखअवघेचिबरें ॥ ज तनकरूंहेआपुलींढोरें ॥ ४ ॥ ॥ २८२० ॥

जायपरतेंकायआणीलाकंटाळा ॥ बोलायेकवेळाऐसें

तरी ॥ १ ॥ कांहोंकेलीतुह्मीनिष्ठुरतादेवा ॥ मानेनाहेंसे
वाकरितोंते ॥ २ ॥ भाग्यवंतत्यांसीसांगितल्यागोष्टी ॥
तेंनाहींअदृष्टींआमुचिया ॥ ३ ॥ तुजऐसास्वामीअसो
निमस्तकीं ॥ होतसेचूकीसंचिताचीया ॥ ४ ॥ तुकाह्मणे
तुह्मापासूनिअंतर ॥ नपडेनाहींस्थीरबुद्धिमाझी ॥ ५ ॥
॥ २८२१ ॥
अनुभवेंकळोंयेतेंपांडुरंगा ॥ रुसावेंतेंकांगातुह्मावरी ॥
॥ १ ॥ आवरितांचित्तनावरेदुर्जन ॥ घातकरीमनमा
झेंमज ॥ २ ॥ अंतरींसंसारभक्तिबाह्याकार ॥ ह्मणो
निअंतरतुझ्यापाईं ॥ ३ ॥ तुकाह्मणेकायकरूंनेणेवर्म ॥
आलेतैसेंकर्मसोसूंपुढें ॥ ४ ॥ ॥ २८२२ ॥
तुजकरितांहोतेअनाचेआन ॥ तारिलेपाषाणउदकींदे
वा ॥ १ ॥ कायकइवाडकरूंअंगीकार ॥ माझावड्डभारज
डझाला ॥ २ ॥ चुकलासीह्मणोंतरीजीवाचाहिजीव ॥
रितानाहींठावउरोदिल्हा ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसेंकायस
त्तावळ ॥ माझेंपरीकृपाळआहातुह्मी ॥ ४ ॥ ॥ २८२३ ॥
फळदेंठिहुनिझडे ॥ मगमागुतेंनजडे ॥ १ ॥ ह्मणोनी
तातडितेखोटी ॥ कारणउचिताचेपोटीं ॥ २ ॥ पुढेंचढें
हात ॥ त्यागमागीलाउचित ॥ ३ ॥ तुकाह्मणेरणीं ॥ न
येपाहोंपरतोनी ॥ ४ ॥ ॥ २८२४ ॥
अंगींदेखोनीयासंतीं ॥ अंगींरोमांचउठती ॥ १ ॥ हातो
नव्हेउपदेश ॥ सुखअंतरींउल्हास ॥ २ ॥ वित्तगोताकडे ॥
चित्तनघालीनारडे ॥ ३ ॥ आठवोनियेका ॥ उडीघा

लीह्मणेतुका ॥ ४ ॥ ॥ ६ ॥ ॥ २८२५ ॥
फळपिकेंदेठी ॥ निमित्यवारियाचेभेटीं ॥ १ ॥ हातोअ
नुभवरोकडा ॥ कळोंयेतोंखराकुडा ॥ २ ॥ तोडिलीया
बळें ॥ वायांजातीकाचींफळें ॥ ३ ॥ तुकाह्मणेमन ॥ ते
थेसकळकारण ॥ ४ ॥ ॥ २८२६ ॥
हालउनिखुंट ॥ आधिकरावाबळकट ॥ १ ॥ मगतया
च्याआधारें ॥ करणेंतेंअवघेंबरें ॥ २ ॥ सुखदुःखसाहे ॥
हर्षामर्षभंगानये ॥ ३ ॥ तुकाह्मणेजीवें ॥ आधिमरो
निराहावें ॥ ४ ॥ ॥ २८२७ ॥
धांवेमातेसोई ॥ बाळनविचारिकांहीं ॥ १ ॥ मगत्याचें
जाणेंनिकें ॥ अंगवोडवीकौतुकें ॥ २ ॥ नेणेसर्पदोरी ॥
आगिभलतेहातींधरी ॥ ३ ॥ तीवीणतेनेणे ॥ आणि
ककांहींतुकाह्मणे ॥ ४ ॥ ॥ २८२८ ॥
भोगद्यावेदेवा ॥ त्यागभोगिचबरवा ॥ १ ॥ आपण
व्हावेंयेकीकडे ॥ देवकळेवरिजोडे ॥ २ ॥ योजेयथाका
ळें ॥ उत्तमकाळादंडेमुळें ॥ ३ ॥ वंचकासीदोष ॥ तु
काह्मणेमिथ्यासोस ॥ ४ ॥ ॥ २८२९ ॥
पायांच्याप्रसादें ॥ कांहींबोलिलोंविनोदें ॥ १ ॥ मज
क्षमाकरणेसंतीं ॥ नव्हेअंगभूतयुक्ति ॥ २ ॥ नव्हेहाउ
पदेश ॥ तुमचेवडवडीलशेष ॥ ३ ॥ तुमचेकृपेचेंपोषणें ॥
जन्मोजन्मींतुकाह्मणे ॥ ४ ॥ ॥ २८३० ॥
जायाचेंअंगुलेंलेतानाहींमान ॥ शोभानेदीजनहास
विले ॥ १ ॥ घुसळितांताककांडितांहीभूस ॥ साध्यना

ईंक्लेशजातीवायां ॥ २ ॥ तुकाह्मणेनाहींस्वतांभांडव
ल ॥ भिकेचेंतेंफोलयोजनोव्हे ॥ ३ ॥ ॥२८३१॥
नबोलावेंपरीपडिलाप्रसंग ॥ हाकलितेंजगतुझ्याना
में ॥ १ ॥ लटिकेंचिसोंगमांडिलापसारा ॥ भिकारीतूं
खराकळों आलें॥२॥निलाजीरींआह्मीकरूनियांधीर॥
राहिलोंआधारधरूनियां॥३॥कैसानेणेआतांकरिसी
शेवट ॥ केलीकटकटल्याचीपुढें ॥ ४ ॥ तुकाह्मणेकांहीं
नबोलसीदेवा ॥ उचितहेसेवाघेईमाझी॥५॥ २८३२॥
नाहींझालेमालकळोंदेतांकाळीं॥ कोणपाहोंबळीदोघां
मध्यें ॥ १ ॥ आह्मोतरिझालोंजीवासीउदार॥ कईचाहा
धीरतुह्मापासीं॥ २ ॥ बहुचालविलेंमागेंआजिवरी॥
आतांपुढेंहरीजाऊंनेदी ॥ ३ ॥ नव्हतीजोंभेटीनामाची
वोळखी॥ ह्मणउनिदुःखीबहुझालों ॥ ४ ॥ तुकाह्मणेकां
हींराहोंनेदीबाकी॥ येकवेळाचुकीझालीआतां ॥ ५ ॥
॥ २८३३ ॥
कैसारूपाळूहेनकळसीदेवा ॥ नबोलसीसेवाघेसीमा
झी॥ १ ॥ कायऐसेंबळआहेतुजपासीं ॥ पाहोंहरिघेसी
कोणआड॥ २ ॥ पाडियेलाठाईंतुझाथारामारा॥ अव
घादातारालपसीतो ॥ ३ ॥ आतांतुह्माआह्माउरितोचि
वरें॥ कायहेंउत्तरवाढऊनी॥ ४ ॥ तुकाह्मणेमजसाह्य
झालेंसंत॥ह्मणउनिमातफावलीहे ॥ ५ ॥ २८३४ ॥
चुकलीयाआह्माकरितसादंड ॥ हाकासीकांखंडपांडु
रंगा॥ १ ॥ चालविलेंयेकेंरिद्धीसिद्धीवरी ॥ तैसामीभि

कारीनव्हेदेवा ॥ २ ॥ कामीयेथेंगुंतोंमांडुनिपसारा ॥
मागुतामाघारादंभासाठीं ॥ ३ ॥ केलेंम्यांजतनआपु
लेंवचन ॥ ठाईंचेंधरूनहोतोंपोटीं ॥ ४ ॥ तुकाह्मणे
ताळाघातलाआडाखी ॥ ठावेहोतेसेखीआडवीसी ॥
॥ ५ ॥ ॥ २८३५ ॥
रूपावंताकोपनधरावाचित्तीं॥ नछळूंवक्रोक्तिस्तुतिक
रूं॥ १ ॥आह्मीतुझापारकायजाणोंदेवा॥नेणोकैसीसे
वाकरावीते॥ २॥ अनंताअरूपाअलक्षाअच्युता॥ नि
र्गुणासच्चितानारायणा ॥ ३ ॥ चांगलींहींनामेंघेतलीं
ठेऊन ॥ झालासीलहानभक्तिकाजा॥ ४ ॥ तुकाह्मणे
तुझ्यापायांवरीसदा ॥ मस्तकगोविंदाअसोमाझा ॥
॥ ५ ॥ ॥ २८३६ ॥
आतांतुझाभावकळोंआलादेवा ॥ ठकोनियांसेवाघे
सीमाझी ॥ १ ॥ टाकोनिसांकडेंआपुलियामाथा ॥
घातलायासंतांवरीभार॥ २ ॥ स्तुतिकरुनियांपिटीला
डांगोरा ॥ तेंकोणदातारासाचकरी ॥ ३॥ जातीचेवा
णीअसेपोटींचेंकूडें ॥ नकामजपूढेंठकाठकी॥ ४ ॥तुका
ह्मणेनाहींआलेंअनुभवा॥ अर्धाचमीदेवाकेंचानाचो
॥ ५॥ ॥ २८३७॥
जनपूजूंयाचामजकांआभार ॥ ह्यातुह्मीविचारजाणा
देवा ॥ १ ॥ पत्रकोणमानीवंदितीलसिक्का॥ गौरवसे
वकांयाचिमूळें॥ २॥ मीपणेंमीहोतोंजनामध्येंआधी
कोणेंदिलेंकधींकायतेव्हां ॥ ३ ॥ आतांतूंभोगितासर्व

नारायणा ॥ नकोआह्मादीनापीडाकरूं ॥ ४ ॥ आपुली
याद्दातेंदेशीलमुशारा ॥ तुकाह्मणेखरातोचिआह्मा ॥
॥२८३८॥

आमुचिकांनयेतुह्मासिकरुणा ॥ कितीनारायणाआ
ळवावें ॥ १ ॥ कायजाणातुह्मीदुर्बळाचेंजीणें ॥ वैभवा
